NAVJYOT / VOL. XII / Issue- II ISSN 2277-8063

# यशवंतराव मोहिते यांच्या विचारांची मुक्त अर्थव्यवस्थेतील प्रस्तुतता

**श्री. केतन दत्तू लाटे, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.**

---

• **सारांश :**

यशवंतराव मोहिते यांनी स्वातंत्र्योतर महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या नेतृत्व आणि कर्तुत्वाचा ठसा उमटवला. महाराष्ट्रात आपल्या अभ्यास, मनन, चिंतनाच्या आधारे मुलभूत विकासाची वस्तुनिष्ट सुरुवात केली. महाराष्ट्रात सलग २८ वर्षे सार्वजनिक धोरण निर्मितीच्या कार्यात सक्रीय सहभाग घेतला. फुले-शाहू-आंबेडकरवादी विचार जोपासले आणि वृद्धिंगत केले. आपल्या वक्तृत्वाने समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. समाजवादी समाजरचना निर्मितीसाठी अनेक नवनवीन योजना तयार करून यशस्वी केल्या. सहकारातून 'रेठरे' हे विकासाचे मॉडेल तयार केले. त्यांचे कार्य आणि विचारांची आजच्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या काळातही प्रस्तुतता जाणवते.

• **पारिभाषिक शब्द :** यशवंतराव मोहिते, समाजवादी विचार, मुक्त अर्थव्यवस्था.

• **प्रस्तावना**

यशवंतराव मोहिते हे महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी समाजवादी नेते होते. त्यांचा राजकीय कालावधी १९५२ ते १९८५ असा होता. मोहिते यांनी वेळोवेळी परखड सुधारणावादी विचार मांडले. मोहिते यांची मार्क्सवादी विचारांवर निष्ठा होती. समाजातील सामान्य जनतेच्या भल्यासाठी सरकारने प्रयत्न करायला पाहिजेत अशी त्यांची भूमिका होती. महाराष्ट्रात समाजवादी समाजरचना लोकशाही पद्धतीने आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यासाठी विविध योजनांची निर्मिती आणि प्रभावी अंमलबजावणी केली.

या शोधनिबंधामध्ये यशवंतराव मोहिते यांच्या विचारांची मुक्त अर्थव्यवस्थेतील आजच्या संदर्भातील प्रस्तुतता समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. यासंदर्भातील मांडणी करीत असताना चार भागात विभागणी केली आहे. १) यशवंतराव मोहिते यांच्या विचारांचे मूलाधार २) मोहिते यांचे सामाजिक व राजकीय विचार ३) मोहिते यांचे सामाजिक व राजकीय कार्य ४) यशवंतराव मोहिते यांच्या विचारांची मुक्त अर्थव्यवस्थेतील प्रस्तुतता.

• **उद्दिष्ट्य**

१) यशवंतराव मोहिते यांच्या सामाजिक व राजकीय विचारांचा अभ्यास करणे.

२) यशवंतराव मोहिते यांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेणे.

३) यशवंतराव मोहिते यांच्या विचारांची मुक्त अर्थव्यवस्थेतील प्रस्तुतता अभ्यासणे.

• **विषय मांडणी**

जगात भांडवलवादाला विरोध म्हणून समाजवाद हे तत्वज्ञान पुढे आले होते. स्वातंत्र्यानंतर भारत हा रशियाप्रणीत समाजवादी विचारांकडे ओढला गेला. त्याला अनुसरून देशात विविध योजना, उपक्रम राबवण्यात आले. भारतात समाजवादी समाजरचना आणण्यासाठी आवडी अधिवेशनापासून (१९५५) प्रयत्न झाले. परंतु १९९१ नंतर भांडवलशाही विचारांवर आधारित मुक्त अर्थव्यवस्थेची सुरुवात झाली. त्यानंतर समाजवादी विचार मागे पडले. परंतु १९४७ ते १९९१ या कालावधीत भारत हा समाजवादी विचारांनीच तयार झाला होता. यशवंतराव मोहिते हे महाराष्ट्राच्या राजकारणातील पुरोगामी लोकशाही विचारांचे समाजवादी नेते होते. यशवंतराव मोहिते यांनी २८ वर्षे महाराष्ट्राच्या राजकारणात महत्वाची भूमिका बजावली. त्यांनी महाराष्ट्रात प्रगल्भ सामाजिक आणि राजकीय विचारांची मांडणी केली.

1. **यशवंतराव मोहिते यांच्या विचार आणि कार्याचे मूलाधार** :

यशवंतराव मोहिते यांचे सामाजिक आणि राजकीय विचार हे प्रस्थापित चालीरूढी, जातीव्यवस्था, ब्राम्हण्यवाद यावर प्रहार करणारे होते. समाजातील विषमता नष्ट करून आधुनिक विचारांवर नवसमाज निर्मितीसाठी पोषक वातावरण तयार करणारे होते. मोहिते यांच्या राजकीय व सामाजिक कार्याला सत्यशोधक-ब्राम्हणेतर चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ यांचा सांस्कृतिक आधार होता. मोहिते यांच्या विचारांवर फुले-शाहू-आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचार आणि कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी विचारांचे संस्कार झाले.

यशवंतराव मोहिते यांनी समाजाची संरचनात्मक निर्मिती, लोकशाही समाजवादाची रुजवणूक आणि समाजातील अंतिम घटकाच्या आर्थिक उन्नतीसाठी राजकारणाचा उपयोग केला. मोहिते यांचे विचार हे वास्तवाशी निगडीत होते. वैज्ञानिक परिवर्तनाला महत्व देणारे होते. समाजनिर्मितीसाठी केवळ वैचारिक मांडणी न करता त्याची स्वत: पासून सुरुवात करणारे आणि इतरांना कृतीप्रवण करणारे होते. मोहिते यांच्या विचारांनी महाराष्ट्रात बहुजन समाजात वैचारिक क्रांतीचे काम केले.

**2.यशवंतराव मोहिते यांचे सामाजिक व राजकीय विचार :**

**• यशवंतराव मोहिते यांचे लोकशाही समाजवादी विचार :**

महाराष्ट्र काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या पन्हाळा येथील (नोव्हेंबर १९७७) शिबिरात यशवंतराव मोहिते यांनी भारतातील लोकशाही समाजवादातील संबंध स्पष्ट केला. त्यांनी भारतीय परिप्रेक्षातून समाजवाद या संकल्पनेचा अर्थ लावला. समाजवादी ध्येय गाठण्यासाठी मार्क्सवादाच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाचे महत्व अधोरेखित केले. त्यांच्यामते लोकशाही समाजवाद म्हणजे उत्पादनांच्या साधनांची सामुदायिक मालकी लोकशाही मार्गाने प्रस्थापित करणे होय. भारतीय समाजाचा विकास विचारात घेवू संपुर्ण समाजाला एकत्रित बांधणारी विचारधारा म्हणून मोहिते यांनी लोकशाही समाजव्यवस्थेचे महत्व अधोरेखित केले. भांडवलशाही आणि साम्यवाद या दोन्हीतील चांगल्या गोष्टींचा मिलाफ म्हणजे भारतातील लोकशाही समाजवाद होय. यशवंतराव मोहिते यांनी लोकशाही समाजवादाची मांडणी श्रमजीवी जनतेला केंद्रस्थानी ठेवून केली परीवर्तन, बदल, क्रांती यातून समाज परिवर्तनासाठी सत्ता आवश्यक असते, सत्तेशिवाय प्रस्तापित चौकट मोडणे अशक्य असते असे मत व्यक्त केले.

**• यशवंतराव मोहिते यांचे ब्राम्हण्यवादाविषयी विचार**

यशवंतराव मोहिते यांचा ब्राम्हण्यवादाला विरोध करून ब्राम्हणेतर चळवळीचे समर्थन केले. मोहिते यांनी आपल्या भाषणांतून ब्राम्हण-ब्राम्हणेतर जातीयता तसेच ब्राम्हण समाजातील पोटजातीयतेवर टीका केली. ब्राम्हणांचा द्वेष करणे वेगळे आणि ब्राम्हण्यवादाला विरोध करणे हा मुद्दा वेगळा असा फरक यशवंतराव मोहिते यांनी केला. त्यामुळे त्यांनी ब्राम्हण जातीच्या लोकांना विरोध न करता सामाजिक राजकीय प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले. १९४८ साली कोल्हापूर येथील जळीतातील ब्राम्हण लोकांसाठी नरसोबाचीवाडी (कोल्हापूर) येथे पुनर्वसन केंद्र तयार केले होते हे याचे उत्तम उदाहरण होते. मोहिते यांचे अनेक मित्र आणि सहकारी हे ब्राम्हण समाजाचे होते.

**• यशवंतराव मोहिते यांचे अस्पृश्यता आणि जातीव्यवस्थेवरील विचार**

यशवंतराव मोहिते यांनी समाजातील जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेवर कठोर शब्दात टिका केली. अस्पृश्यता घालवण्यासाठी मोहिते यांनी आंतरजातीय विवाहाचा (रोटी-बेटी व्यवहार) पुरस्कार केला होता. समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी तसेच समाजातील अस्पृश्यता आणि जातीव्यवस्था नष्ट करायला पाहिजे असे मत मोहिते यांनी मांडले. सर्वसाधारणपणे माणसाच्या आडनावावरून त्याची जात ठरवली जाते. त्यामुळे आडनाव वापरण्याऐवजी गावाचा उल्लेख करावा. जेणेकरून त्याच्यावरून व्यक्तीची जात समजणार नाही. मोहिते यांनी व्यक्तीचे नाव 'यशवंतराव जिजाबा मोहिते' न लावता 'यशवंतराव जिजाबा रेठरेकर' याप्रमाणे वापरावे असे सांगितले.

यशवंतराव मोहिते यांच्यामते, समाजातील अस्पृश्यता संपवन्यासाठी 'अस्पृश्य' शब्दाचा वापर बंद केला पाहिजे. कारण माणूस 'अस्पृश्य' आहे हे मान्य केल्यावर आपला त्याच्यासोबतचा व्यवहार बदलतो. हा सूक्ष्म बदल दिसत असला तरी तो मानसिकदृष्ट्या मोठा आहे. मोहिते स्वत: जातीभेद मानत नव्हते. कोणत्याही जातीधर्माचा व्यक्ती आला तरी ते त्याला समानतेची वागणूक देत असत. १९७५ साली 'कमाल जमीन धारणा' कायदा करताना त्यांनी स्वत:ची साडे बावीस एकर जमीन भूमिहीन मागासवर्गीय लोकांना विनामोबदला वाटली होती.

**3. यशवंतराव मोहिते यांचे सामाजिक व राजकीय कार्य :**

**• निस्वार्थी राजकारणाची तीन दशके** : यशवंतराव मोहिते यांनी १९५१ ते १९८० अखेर राज्याच्या विधीमंडळात राजकीय सक्रीय सहभाग नोंदवला. विरोधात असो अथवा सत्तेत यशवंतराव मोहिते यांनी आपल्या

पुरोगामी आणि अभ्यासू नेतृत्वाने, कर्तृत्वाने महाराष्ट्राच्या राजकारण प्रभावित केले. महाराष्ट्रात मोहिते यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कृषी-औद्योगिक समाजरचना या संकल्पनेला वृद्धिंगत करण्याचे कार्य केले. चव्हाण यांच्याविषयी त्यांना आदर होता. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांना पर्याय निर्माण करण्यासाठी इंदिरा गांधी यांनी मोहिते यांना मुख्यमंत्रीपदाची संधी देवू केली होती. मात्र यशवंतराव चव्हाण यांच्या सहमतीशिवाय मुख्यमंत्री होण्यात अर्थ नाही हे जाणून त्यांनी नम्रपणे नकार दिला. वैयक्तिक स्वार्थापेक्षा राज्याचे हित पाहिले.

- **सार्वजनिक धोरण निर्मितीत सक्रीय सहभाग :**

१९५२ ते १९६० पर्यंत विरोधी पक्षात असताना महाराष्ट्राच्या इतिहासातील ‘कोयना धरण’ आणि ‘संयुक्त महाराष्ट्र’ असे दोन महत्वाचे ठराव यशवंतराव मोहिते यांनी सभागृहात मांडले. मोहिते हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रगण्य नेतृत्व होते. यशवंतराव मोहिते १८ वर्षे महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळात कार्यरत होते. याकाळात त्यांनी विविध खात्यांचे मंत्री (गृह उपमंत्री, शेती उपमंत्री, परिवहन आणि गृहनिर्माण मंत्री, सहकार मंत्री, अर्थमंत्री) म्हणून कार्य केले. गृहउपमंत्री असताना होमगार्ड संघटनेची पुनर्रचना, पोलीस दलाचे आधुनिकीकरण केले. गृहनिर्माण मंत्री म्हणून मुंबई येथील चाळी कायम करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. झोपडपट्ट्यांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. सहकार मंत्री म्हणून मोहिते यांनी शेतीपूरक सहकारी जोडधंद्यांवर भर दिला. कल्पकतेने १९७१ मध्ये पुरोगामी ‘क्रांतिकारी कापूस एकाधिकार योजना’ तयार केली. अर्थमंत्री म्हणून सामाजिक न्यायाला प्राधान्य देवून न्यायाधीष्टीत सामाजिक अर्थव्यवस्था आणण्यासाठी अत्यंत शिस्तीचे आणि शिलकीचे अर्थसंकल्प मांडण्याचे काम यशवंतराव मोहिते यांनी केले.

- **सहकार चळवळीतील योगदान**

मोहिते यांनी १९५४ साली सहकारातून पश्चिम महाराष्ट्रातील ‘कृष्णा’ या पहिल्या साखर कारखान्याची स्थापना रेठरे बुद्रुक (कराड) येथे केली. कारखान्याच्या सहकार्यातून कराड परिसरात दुग्धसंस्था, कुक्कुटपालन संस्था, वराहपालन संस्था, सहकारी बँक, छापखाना, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ (शिक्षणसंस्था), कृष्णा वैद्यकीय संकुल उभारले. सहकारातून ‘रेठरे’ हे विकासाचे मॉडेल विकसित केली. यशवंतराव मोहिते यांनी राजकीय कारकिर्दीत महाराष्ट्रात सहकारी संस्थांची संख्या आणि त्यांची कार्यक्षमता वाढवण्यावर भर दिला. तसेच साखर कारखाना, साखर उद्योग विकास महामंडळ, साखर संचलनालय, विपणन संचलनालय, रयत संघर्ष मंच अशा अनेक सामाजिक संस्था स्थापन केल्या. १९६९ मध्ये सहकारमंत्री झाल्यावर मोहिते यांनी सहकार चळवळीची चिकित्सा करणारी ‘सहकार चळवळ एक पुनर्मुल्यांकन’ अशी श्वेतपत्रिका तयार केली. त्यात सहकारातील दोष दाखवून त्यावर उपाय सुचविले होते.

**4. यशवंतराव मोहिते यांच्या विचारांची प्रस्तुतता :**

यशवंतराव मोहिते यांच्या विचार आणि कार्यावरून ते समाजवादी समाजरचनेचे आणि सुधारणावादी विचारांचे पुरस्कर्ते होते हे स्पष्ट होते. समता, बंधुभाव व धर्मनिरपेक्षता हे तत्वांचा मूलाधार त्यांच्या कार्याला प्राप्त झाला. स्वातंत्र्यानंतर कालावधीत नव महाराष्ट्र निर्मितीसाठी मोहिते यांनी प्रयत्न केले. शेतकरी, कामगार, कष्टकरी जनतेच्या हिताचे निर्णय घेण्याचे कार्य मोहिते यांनी केले. यशवंतराव मोहिते यांचे विचार हे आजच्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या काळातही तितकेच ताजे आणि समाजातील अनिष्ठ चालीरीती आणि जातीयतेवर प्रहार करणारे आहेत असे म्हणता येवू शकते. मुक्त अर्थव्यवस्थेत भांडवलीकरणाचे दोष दिसू लागल्याने सहकाराचे महत्व जाणवत आहे. अशावेळी मोहिते यांचे सहकाराविषयीचे विचारांची आजही प्रस्तुतता दिसून येते.

१९९१ साली मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारल्यानंतर भारतामध्ये समाजवादी धोरणे, विचार यांची पिछेहाट झाली. बदलती आर्थिक घडीशी सुसंगत राहून सहकारात बदल होणे अपेक्षित असताना तो झाला नाही. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे समाजवादी धोरणाला उतरती कळा लागली. कष्टकरी जनतेपेक्षा बड्या भांडवलदार वर्गाच्या हिताचे निर्णय घेतले जात असल्याचे दिसते. मोहिते यांनी मांडलेली सर्वसामान्य जनतेच्या भल्यासाठी असलेल्या समाजवादी समाजरचनेची उपयुक्तता पुन्हा एकदा जाणवते. तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे आज जग एक वैश्विक खेडे बनले आहे. तरी जातीयता कमी झाल्याचे दिसत नाही. समाजात ‘रोटी-बेटी’ व्यवहारास अजूनही मान्यता नाही. समानता

प्रस्थापित होण्यापेक्षा विषमतेचे प्रमाण वाढत आहे. समाजातील 'नाही रे' वर्गाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढत आहे. ब्राम्हण्यवाद हा नव्या स्वरूपातसमोर येत आहे. अशावेळी मोहिते यांनी मांडलेल्या विचारांची उपयुक्तता दिसून येते.

यशवंतराव मोहिते यांनी मुख्यमंत्रीपद मिळत असताना ते नम्रपणे नाकारले. स्वार्थापेक्षा तत्वनिष्ट राजकारण केले होते. आजच्या घडीला मुख्यमंत्रीपद मिळावे म्हणून नेत्यांच्यातील स्पर्धा पाहताना राज्याच्या हितासाठी मुख्यमंत्रीपद नाकारणाऱ्या यशवंतराव मोहिते यांच्या वैचारिक आणि तत्वनिष्ट राजकारणाची आठवण येते. आज राजकारण हे फक्त सत्ता मिळवणे याच एकमेव उद्देशाने केले जाते. सामान्य जनतेच्या भल्यासाठी राजकारण करायचे असते हे मोहिते यांचे विचारचे महत्व जाणवते.

आज जगण्याचे संदर्भ बदलत आहेत. जग छोटे झाले आहे. आजचा महाराष्ट्र आणि ६०-७० वर्षापूर्वीचा महाराष्ट्र यात फरक आहे. आजच्या महाराष्ट्रातील प्रश्नाचे संदर्भ वेगळे आहेत. अशा स्थितीत मोहिते यांनी मांडलेले विचार, उपाय उपयुक्त ठरतील यात शंका निर्माण होऊ शकते. तथापि मोहिते यांच्या वैचारिक मांडणीचे मूलाधार विसरून चालणार नाही. आजच्या बदललेल्या संदर्भात मोहिते यांच्या विचारांचे, कार्याचे मूलाधार हे प्रेरणादायी ठरणार आहेत. त्यामुळे आजच्या संदर्भातही मोहिते यांच्या विचारांची प्रस्तुतता सिद्ध होते.

• **निष्कर्ष :**

1.यशवंतराव मोहिते यांनी नवमहाराष्ट्रात समाजवादी समाजरचना आणण्यासाठी प्रयत्न केले.

2.यशवंतराव मोहिते यांनी सहकारी चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासाचे प्रयत्न केले.

3.यशवंतराव मोहिते यांचे समाजवादी, सुधारणावादी विचार आजच्या मुक्तअर्थव्यवस्थेच्या काळातही उपयुक्त आहेत.

• **संदर्भ :**

1.महाराष्ट्रातील सहकार चळवळ-एक पुनर्मुल्यांकन.

2.पन्हाळ्याचे शिबीर.

3.महाराष्ट्रातील सहकार चळवळ आणि युती शासनाचे धोरण.

4.यशवंतरावजी मोहिते अमृत महोत्सवी गौरव ग्रंथ.

5.आमचे भाऊ - मा. यशवंतरावजी मोहिते.

6.दैनिक सकाळ, दि. ७ नोव्हें. २००९.

7.महाराष्ट्र टाईम्स, दि.३० जाने. २०१९.